## बहि:स्थ परीक्षा व गुणपत्रिकेबाबत

सर्व बहि:स्थ विद्यार्थ्यांना सूचीत करण्यात येते की, परीक्षांसंदर्भात सर्व माहीती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असते. या संकेतस्थळावर पहील्या पानावर **examination>schedule** अशी लिंक आहे त्यावर क्लीक केल्यावर नियोजित परीक्षा केव्हा आहेत याची सर्व माहीती दिलेली असते. तसेच परीक्षेच्या आधी आठ दहा दिवस विद्यापीठाच्या **unipune.ac.in** या संकेतस्थळावर **examination>time table** अशी लिंक दिलेली आहे तेथे क्लीक केल्यावर सर्व परीक्षांची वेळापत्रके दिलेली असतात. विद्यार्थ्यांनी वेळोवेळी जागरुक राहून या संकेतस्थळाला भेट द्यावी व सर्व माहीती जाणून घ्यावी. ज्यांनी नव्याने बहि:स्थ अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्यांची प्रथम परीक्षा मार्च/एप्रिल मध्ये असते. ज्या विद्यार्थ्यांनी राहीलेले विषय देण्यासाठी परीक्षा अर्ज भरलेला असतो अशा विद्यार्थ्यांची परीक्षा ऑक्टोबर/नोव्हेंबर मध्ये असते. विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावरुन याबाबत वेळोवेळी माहीती घ्यावी. परीक्षा,हॉल तिकीट,निकाल याबाबत विद्यार्थ्यांना एसएमएस पाठवून कळविण्यात येते परंतु काही कारणांस्तव एसएमएस मिळाला नाही म्हणून विद्यार्थ्यांनी गाफील न राहता सतत संकेतस्थळ पाहण्याची सवय ठेवावी जेणेकरुन चालू घडामोडीबाबत विद्यार्थ्यांना माहीती मिळत राहील.

परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर **app1.unipune.ac.in/external** या संकेतस्थळावर संबंधित वर्षाच्या परीक्षेच्या निकालाची प्रत उपलब्ध करुन देण्यात येते विद्यार्थ्यांनी स्वत:चा निकाल या संकेतस्थळावरुन प्रिंट करुन सांभाळून ठेवावा. बहि:स्थ विभागात मूळ निकालाच्या प्रती प्राप्त झाल्यानंतर आठ दिवसापर्यंत विभागाच्या कार्यालयात ठेवले जातात. ज्यांना शक्य आहे त्यांनी विभागातून निकालपत्र घेवून जावे असा मेसेज विद्यार्थ्यांना पाठविला जातो. त्यानंतर सर्व गुणपत्रिका स्पीड पोस्टद्वारे विद्यार्थ्यांना पाठविल्या जातात. काही कारणांस्तव जर पोस्टाद्वारे विद्यार्थ्यास गुणपत्रिका मिळाली नाही आणि पोस्टाद्वारे अशी गुणपत्रिका बहि:स्थ विभागास प्राप्त झाली तर अशा गुणपत्रिका सहा महीने विभागात ठेवल्या जातात. निकाल जाहीर झाल्यानंतर सहा महीन्याच्या आत विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिका घेवून जाव्यात, यानंतर सदर गुणपत्रिकांची जबाबदारी विभाग घेत नाही.

## External Examinations and Marksheets

All the external students please note that the information regarding the exam schedules and Time Tables is made available on Savitribai Phule Pune University's web site. For the examination schedule the link is : **unipune.ac.in>examination>schedule** and for time tables the link is: **unipune.ac.in>examination>time table**

You must be alert every time and should visit these web sites to update the required information. Freshers examinations are scheduled in the month of March/April. Repeater students examinations are scheduled in the month of October/November.

After the declaration of the results students can take a print out of their result from external section's web site – **app1.unipune.ac.in/external**

External students are requested to collect their result by hand from Eexternal Section's office. External Section keeps all the original marksheets upto eight days for hand delivery. After that the marksheets sent through **Speed Post**. In case if the student did not received the same by post and if the post office returns the marksheet to External Section, then the section keeps such marksheets for six months in their office. Those who did not get their result by post should contact the External Section personally within six months after the declaration of the result. Please note that after six months External Section will not take any responsibility of such marksheets. Regarding examinations, results, marksheets, students are requested that they should always be in touch with External Section's and Savitribai Phule Pune University's web site for current updates, do not depend on the sms communications.